महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८ सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
Email- preserviceedudept@maa.ac.in

जा.क्र.राशैसंप्रपम/सेवापूर्व शिक्षण/प्रवेश कक्ष/२०२३-२४/02920 दि. 27/०६/२०२३

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व),
२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व),
३) शिक्षण निरीक्षक, मुंबई (दक्षिण)

विषय:- डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया सन २०२३-२४ मुदत वाढीबाबत

संदर्भ:- १) राज्यस्तरीय डी.एल.एड प्रवेश निवड, निर्णय व संनियंत्रण समिती बैठक दि.१३/८/२०२१ चे मान्य इतिवृत्त
२) या कार्यालयाचे पत्र क्र. राशैसंप्रपम/सेवापूर्व शिक्षण/प्रवेश कक्ष/२०२२-२३/२६३०, दि.०९/०६/२०२३
३) या कार्यालयाचे पत्र क्र. राशैसंप्रपम/सेवापूर्व शिक्षण/ प्रवेश कक्ष/२०२२-२३/२६३१, दि. ०९/०६/२०२३
४) प्राचार्य, अध्यापक विद्यालये यांची प्राप्त पत्रे दि.२७/०६/२०२३

उपरोक्त संदर्भ क्र. १ चे मान्य इतिवृत्तानुसार ज्या अध्यापक विद्यालयांनी विहित मुदतीत नोंदणी केली नाही अशा अध्यापक विद्यालयांची विलंब शुल्कासह नोंदणी करणेसाठीची मुदत दि.२६/०६/२०२३ रोजी संपलेली आहे.

संदर्भीय पत्र क्र. २ व ३ अन्वये निर्देशित केलेप्रमाणे सन २०२३-२४ ची डी.एल.एड. प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि.१३/०६/२०२३ पासून सुरु झालेली असून ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दि. २७/०६/२०२३ पर्यंत देण्यात आली होती.

तथापि उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ४ अन्वये संबंधित अध्यापक विद्यालायांनी विद्यार्थ्यांना कागदपत्रे सादर करणेकरिता तांत्रिक अडचणी येत असल्याने ऑनलाईन अर्ज सादर करण्यास मुदत वाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. प्राप्त विनंती अर्जानुसार ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत दि. ०४/०७/२०२३ पर्यंत वाढविण्यात येत आहे. त्यानुसार फेरीनिहाय शासकीय व व्यवस्थापन कोट्याचे सुधारित वेळापत्रक, विद्यार्थ्यांनी विकल्प भरण्याची मुदत दिनांक, प्रथम वर्ष सुरु दिनांक, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी अध्यापक विद्यालयनिहाय झालेल्या प्रवेशाचा आढावा घेणे इ. तपशिलाचे वेळापत्रक परिषदेच्या www.maa.ac.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेले आहे.

दि.०४/०७/२०२३ नंतर ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरिता कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

त्याकरिता प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी पडताळणी अधिकारी व प्राचार्य अध्यापक विद्यालय यांना द्यावयाच्या सूचना पुढीलप्रमाणे —

१) पडताळणी अधिका-यांनी पडताळणी काळजीपूर्वक करावी. ऑनलाईन पडताळणी केल्याशिवाय विद्यार्थी प्रवेशप्रक्रियेत समाविष्ट होणार नाही याची नोंद घ्यावी.

२) व्यवस्थापन कोट्याचे संदर्भात संबंधित प्राचार्य यांनी वेळापत्रकानुसार विहित कालावधीत कार्यवाही पूर्ण करावी.

३) प्राचार्य अध्यापक विद्यालय यांनी विद्यार्थ्यांस online admit करून घेणे आवश्यक आहे.

४) विद्यार्थ्यांची मूळ प्रमाणपत्रे तपासून संबंधितास online admit न केल्यास व त्यामुळे विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य अध्यापक विद्यालय यांची राहील.

करिता उपरोक्तप्रमाणे सुधारित वेळापत्रकानुसार डी.एल.एड प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशाबाबत करावयाच्या कार्यवाही संबंधितांनी विहित कालमर्यादेत करावी.

सोबत :- सुधारित शासकीय व व्यवस्थापन कोट्याचे वेळापत्रक

(कौस्तुभ दिवेगांवकर)
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण
परिषद, महाराष्ट्र, पुणे

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे

## डी.एल.एड प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशाचे वेळापत्रक सन २०२३-२४ (शासकीय कोटा)

| अ.क्र | कार्यवाहीचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | उमेदवारानी ऑनलाईन आवेदनपत्र भरणे | दि.१३/०६/२०२३ ते दि.०४/०७/२०२३ |
| २. | DIET स्तरावर पूर्ण भरलेल्या आवेदनपत्राची ऑनलाईन पडताळणी करणे. | दि.१३/०६/२०२३ ते दि.०५/०७/२०२३ |
| ३. | Objection cum merit list प्रसिद्ध करणे व आक्षेप निरसन | दि.०७/०७/२०२३ |
| ४. | पूर्ण भरलेल्या अर्जांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. | दि.१०/०७/२०२३ |
| ५. | प्रथम फेरी प्रवेशाची यादी जाहीर करणे. | दि. ११/०७/२०२३ |
| ६. | प्रथम फेरीतील उमेदवारानी प्रवेश घेणे. | दि.११/०७/२०२३ ते दि.१४/०७/२०२३ |
| ७. | प्रथम फेरीतील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी DIET कडे Loginवर पाठविणे. | दि.१४/०७/२०२३ |
| ७. | दुसऱ्या फेरीसाठी विकल्प देणे. (उमेदवारास बदल करावयाचा असल्यास) अन्यथा पूर्वी भरलेले विकल्प ग्राह्य धरले जातील. | दि.१५/०७/२०२३ |
| ८. | दुसरी प्रवेश फेरी यादी जाहीर करणे. | दि.१८/०७/२०२३ |
| ९. | दुसऱ्या प्रवेश फेरीतील उमेदवारानी प्रवेश घेणे. | दि.१८/०७/२०२३ ते दि.२१/०७/२०२३ |
| १०. | दुसऱ्या फेरीतील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी DIET कडे Login वर पाठविणे. | दि.२१/०७/२०२३ |
| ११. | तिसऱ्या फेरीसाठी विकल्प देणे. (उमेदवारास बदल करावयाचा असल्यास) अन्यथा पूर्वी भरलेले विकल्प ग्राह्य धरले जातील. | दि.२२/०७/२०२३ |
| १२. | तिसरी व अंतिम प्रवेश फेरी यादी जाहीर करणे. | दि.२५/०७/२०२३ |
| १३. | तिसऱ्या प्रवेश फेरीतील उमेदवारानी प्रवेश घेणे. | दि.२५/०७/२०२३ ते दि.२८/०७/२०२३ |
| १४. | तिसऱ्या फेरीतील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची यादी DIET कडे Login वर पाठविणे. | दि.२८/०७/२०२३ |
| १५. | प्रथम वर्ष सुरु दिनांक | दि.२०/०७/२०२३ |
| १६. | DIET प्राचार्यांनी जिल्ह्यातील अध्यापक विद्यालयनिहाय झालेल्या प्रवेशाची खात्री करून घेणे. | दि.३१/०७/२०२३ ते दि.०२/०८/२०२३ |

सूचना - १. प्रत्येक प्रवेश फेरीतील यादी जाहीर झाल्यापासून उपरोक्त ठरवून दिलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा.

२. उपरोक्त वेळापत्रक संभाव्य असून यामध्ये बदल करण्याचा अधिकार अध्यक्ष, राज्यस्तरीय डी.एल.एड प्रवेश निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती, पुणे यांना राहील.

(कौस्तुभ दिवेगावकर)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय डी.एल.एड प्रवेश निवड,
निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती, पुणे

## डी.एल.एड प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेशाचे वेळापत्रक सन २०२३ -२४ (व्यवस्थापन कोटा)

| अ.क्र | कार्यवाहीचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | उमेदवारानी ऑनलाईन आवेदनपत्र भरणे | दि.१३/०६/२०२३ ते दि.०४/०७/२०२३ |
| २. | संबंधित अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोटयाची प्रवेशप्रक्रिया नियमावलीनुसार राबविणे. | दि.०५/०७/२०२३ ते दि.२२/०७/२०२३ |
| ३. | अध्यापक विद्यालयांनी व्यवस्थापन कोटाप्रवेशाचे प्रस्ताव संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे ऑनलाईन सादर करणे.(Forward) | दि.२५/०७/२०२३ पर्यंत |
| ४. | विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी ऑनलाईन प्राप्त प्रस्ताव तपासून त्यांचे Loginमधून प्रवेश Confirm करणे. | दि. २६/०७/२०२३ ते दि.२८/०७/२०२३ |
| ५. | प्रथम वर्ष सुरु दिनांक | दि.२०/०७/२०२३ |

विहित कालावधीत संबंधितांनी कार्यवाही पूर्ण न केल्यास व विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्राचार्य, अध्यापक विद्यालय यांची राहील याची नोंद घ्यावी.

(कौस्तुभ दिवेगावकर)
अध्यक्ष,
राज्यस्तरीय डी.एल.एड प्रवेश निवड,
निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती, पुणे